**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ८७४/२०२२**

तक्रारकर्ता, श्री.पद्माकर काशिनाथ वेखंडे
मु.जांभे, पो.लेनाड खु.
ता.शहापुर, जि.ठाणे

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय शिरगाव,
ता.शहापूर, जि.ठाणे

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय शिरगाव,
ता.शहापूर, जि.ठाणे

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २१/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २९/४/२०२२ | १९/५/२०२२ | ६/६/२०२२ | २३/६/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.१९/९/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " परिपूर्ण माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २१/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती चैताली राठोड, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत शिरगांव उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" ग्रुप ग्रामपंचायत शिरगाव मध्ये एकुण किती लघुपाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत याची अंदाजपत्रक व मुल्यांकणासहीत संपुर्ण खर्चाची माहिती मिळण्याबाबत व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.२३/६/२०२२ रोजी सुनावणी घेऊन, *"अर्जात नमूद केलेली माहिती अपिलकर्ते यांना दि.२९/६/२०२२ पर्यंत विनामूल्य देण्यात यावी व त्याचा अहवाल या कार्यालयात सादर करावा."* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झालेली आहे. लघु पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायत शिरगाव या प्रकरणाच्या माहितीमध्ये या योजनेची रिकॅप्टलेशन शीट परिपूर्ण माहिती मिळालेली नाही. तसेच जांबे येथील लघु पाणीपुरवठा योजनेची सविस्तर माहिती दिली नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. उपरोक्त विवेचनात नमूदप्रमाणे तक्रारदार यांना न पुरविण्यात आलेली माहिती, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ मे, २०२५ .

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

Comp-३